# Washim District Police

**Nature of Work** :- **Police Person Good Work**

**Police Station** :- **SP Office Washim**

**Date of Good Work done** :- **18/04/2022**

**Brief of the work done :-**

जम्मू काश्मीर येथील सिनिअर ओपन नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेत भाग्यश्री बल्लाळ हिने रौप्य व झारखंड येथील खेलो इंडिया नॅशनल रँकिंग धनुर्विद्या स्पर्धेत रेखा लांडकर हिने रौप्य पदक प्राप्त करून वाशिम पोलीस दलाची मान उंचावली त्याबद्दल अभिनंदन

## धनुर्विद्या स्पर्धेत भाग्यश्री बल्लाळ, रेखा लांडकरला रौप्यपदक

**वाशीम** , ब्युरो. जम्मू काश्मिर येथे झालेल्या वी सिनिअर ओपन नॅशनल चॅम्पिअन शिपस्पर्धेत व झारखंड येथे झालेल्या खेलो इंडिया नॅशनल रॉकिंग धनुर्विद्या स्पर्धेत वाशीम पोलिस दलातील भाग्यश्री बल्लाळ व रेखा लांडकर या दोन महिला खेळाडूंनी रौप्यपदक पटकावून वाशीम जिल्ह्याचे नावलौकीक केले आहे.



धनुर्विद्या नॅशनल चॅम्पिअनशिप जम्मू काश्मीर 41 वी सिनिअर ओपन नॅशनल चॅम्पीअन शिप धनुर्विद्या स्पर्धा 21 मार्च ते 30 मार्चदरम्यान जम्मू काश्मीर येथे संपन्न झाली. या स्पर्धामध्ये महाराष्ट्र पोलीस संघा मधून निवड झालेली वाशीम जिल्हा पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी भाग्यश्री बल्लाळ यांनी कम्पाउंड 50 मीटर या खेळात रौप्य पदक भारतीय पोलीस संघाकडून प्राप्त केले आहे. तसेच खेलो इंडीया नॅशनल रॉकिंग धनुर्विंद्या स्पर्धा 10 ते 14 एप्रिल दरम्यान झारखंड राज्यातील टाटा नगर जमशेदपूर येथे संपन्न झालेल्या स्पर्धामध्ये महाराष्ट्र पोलीस संघा मधून निवड झालेली वाशीम जिल्हा पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी रेखा लांडकर यांनी कम्पाउंड 50 मीटर या खेळात रौप्य पदक भारतीय पोलीस संघाकडून प्राप्त केले आहे. भाग्यश्री बल्लाळ व रेखा लांडकर यांनी वाशीम जिल्हाबरोबरच अमरावती परिक्षेत्राचे तसेच वाशीम जिल्हा पोलीस दलाचे नाव लौकीक केले आहे. या कामगिरी बद्दल पोलीस अधिक्षक बच्चन सिंह तसेच अप्पर पोलीस अधिक्षक गोरख भामरे, सोमनाथ जाधव, मांगीलाल पवार, आशिष जैस्वाल तसेच जिल्ह्यातील अधिकारी,कर्मचारी यांच्याकडून कौतुक करण्यात आले आहे.